जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2023

लोकमत

# हरयाणाच्या महर्षी दयानंद विद्यापीठास कुस्ती स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद

## अखिल भारतीय फ्रीस्टाईल कुस्ती : अक्षय मंगावडे यास कांस्य पदक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात आयोजित अखिल भारतीय फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत मंगळवारी हरयाणातील रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. शिवाजी विद्यापीठाच्या अक्षय मंगावडे याने १२५ किलो वजनी गटात कांस्य पदक प्राप्त केले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेश कुमार मलिक, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार देण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, कराड येथील प्रकाशबापू पाटील यांच्यासह स्पर्धा संचालक दिलीप पवार, तांत्रिक संचालक बंकट यादव, आंतरराष्ट्रीय रेफ्री नवनाथ ढमाळ आदी उपस्थित होते. डॉ. विजय रोकडे यांनी स्वागत केले. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी आभार मानले. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धा तीन दिवसांपासून सुरू होत्या, याची सांगता झाली. २७ ते २९ जानेवारीअखेर ग्रीको रोमन कुस्त्या होतील. मंगळवारी पंजाबमधील भटिंडा येथील गुरू काशी विद्यापीठाने द्वितीय स्थान, तर हरयाणा कुरूक्षेत्र येथील कुरूक्षेत्र विद्यापीठाने तृतीय स्थान प्राप्त केले.



शिवाजी विद्यापीठात अखिल भारतीय फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेतील विजेत्या मल्लांना पदक देऊन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेश कुमार मलिक, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदींच्या हस्ते गौरवण्यात आले.

### विविध गटांत सुवर्ण, रौप्य व कांस्य विजेते

- **५७ किलो :** सतीश (चौधरी बन्सीलाल विद्यापीठ, भिवानी) सुमित (इंदिरा गांधी विद्यापीठ, मिरपूर हरयाणा) अमितकुमार (गुरुग्राम विद्यापीठ, गुरुग्राम) सुनील (ओ. पी. जे. एस. विद्यापीठ, चिरु, राजस्थान).
- **६१ किलो :** सुधीर जाट (बीर टिकेंद्रजी विद्यापीठ, मणिपूर), आशिष (इंदिरा गांधी विद्यापीठ, हरयाणा), लोकपाल गोहर (देवी अहिल्या विद्यापीठ, इंदूर), उदित (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक).
- **६५ किलो :** जसकरण सिंग (पंजाबी विद्यापीठ, पटियाला), रोहित (बीर टिकेंद्रजित विद्यापीठ, मणिपूर), आयुष कुमार (छ. चरणसिंग विद्यापीठ, मेरठ), सचिन दहिया (पंजाब विद्यापीठ, चंडीगड).
- **७० किलो :** परवेंदर (लवली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवाडा), विजय मलीक (चंडीगड विद्यापीठ, मोहाली), राकेश कुमार (सिंघानिया विद्यापीठ, झुनझुनू, राजस्थान), सौरभ सेहावत (गुरु काशी विद्यापीठ, भटिंडा).
- **७४ किलो :** रविराज चव्हाण (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ), मोहित (देश भगत विद्यापीठ, मंडी गोविंदग्राम, पंजाब), दीपक (गुरु जंबेश्वर विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठ, हिस्सार), दीपक (कुरुक्षेत्र विद्यापीठ).
- **७९ किलो :** सागर जगलान (कुरुक्षेत्र विद्यापीठ), अनिकेत (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), अनुज कुमार (छत्रपती चरणसिंग विद्यापीठ, मेरठ), मुकुल मिश्रा (जननायक चंद्रशेखर विद्यापीठ, बल्लिया).
- **८६ किलो :** संदीप (चित्करा विद्यापीठ, राजपुरा, पंजाब), एम. एम. सरनोबत (स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), प्रतीक जगताप (सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे), संजीव (गुरु काशी विद्यापीठ, भटिंडा)
- **९२ किलो :** अजय (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), अंकित (इंदिरा गांधी विद्यापीठ, मीरपूर, हरयाणा), पवन (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर), आशिष (कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र).
- **९७ किलो :** साहिल (गुरु काशी विद्यापीठ, भटिंडा), अभिषेक खोखर (छ. चरणसिंग विद्यापीठ, मेरठ), आकाश (चित्करा विद्यापीठ, रायपूर, पंजाब), दीपक कुमार (कलिंगा विद्यापीठ, छत्तीसगड)
- **१२५ किलो :** अनिरुद्ध कुमार (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), आकाश अंतिल (गुरु काशी विद्यापीठ, भटिंडा), अमन (गुरु नानक देव विद्यापीठ), अक्षय एस. मंगावडे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 JAN 2023

पुढारी

# फ्रीस्टाईल प्रकारात रोहतकचे महर्षी दयानंद विद्यापीठ सर्वसाधारण विजेते

अ.भा. आंतरविद्यापीठ कुस्ती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात गेले तीन दिवस सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेतील फ्रीस्टाईल प्रकारात रोहतक (हरयाना) येथील महर्षी दयानंद विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. भटिंडा येथील गुरू काशी विद्यापीठाने द्वितिय स्थान तर कुरुक्षेत्र येथील कुरूक्षेत्र विद्यापीठाने तृतीय स्थान प्राप्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या अक्षय मंगावडे याने १२५ किलो वजनी गटात कांस्य पदक प्राप्त केले.

स्पर्धेत विविध वजनी गटांमध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक प्राप्त करणारे खेळाडू असे : ५७ किलो : सतीश (चौधरी बन्सीलाल विद्यापीठ, भिवानी) सुमित (इंदिरा गांधी विद्यापीठ, मिरपूर हरियाणा) अमितकुमार (गुरुग्राम विद्यापीठ, गुरुग्राम) सुनिल (ओ.पी.जे.एस. विद्यापीठ, चिरु, राजस्थान). ६१ किलो: सुधीर जाट (बीर टिकेंद्रजी विद्यापीठ, मणिपुर), आशिष (इंदिरा गांधी विद्यापीठ, हरियाणा), लोकपाल गोहर (देवी अहिल्या विद्यापीठ, इंदुर), उदित (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक). ६५ किलो : जसकरण सिंग (पंजाबी विद्यापीठ, पटियाला), रोहित (बीर टिकेंद्रजित विद्यापीठ, मणीपूर), आयुष कुमार (छ. चरणसिंग विद्यापीठ, मेरठ), सचिन दहीया (पंजाब विद्यापीठ, चंदिगड). ७० किलो: परवेंदर (लवली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवाडा), विजय मलिक (चंदिगड विद्यापीठ, मोहाली), राकेश कुमार (सिंघानिया विद्यापीठ, झुनझुनु, राजस्थान), सौरभ सेहावत (गुरु काशी विद्यापीठ, भटिंडा). ७४ किलो: रविराज चव्हाण (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर), मोहीत (देश भगत विद्यापीठ, मंडी गोविंदग्राम, पंजाब), दीपक (गुरु जंबेश्वर विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठ, हिस्सार, हरियाणा), दिपक (कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र). ७९ किलो: सागर जगलान (कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र), अनिकेत (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), अनुज कुमार (छत्रपती चरणसिंग विद्यापीठ, मेरठ), मुकुल मिश्रा (जननायक चंद्रशेखर विद्यापीठ, बल्लिया). ८६ किलो: संदिप (चित्करा विद्यापीठ, राजपुरा पंजाब), एम.एम. सरनोबत (स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), प्रतीक जगताप (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे), संजीव (गुरु काशी विद्यापीठ, भटिंडा). ९२ किलो: अजय (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), अंकित (इंदिरा गांधी विद्यापीठ, मीरपूर, हरियाणा), पवन (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर), आशिष (कुरूक्षेत्र विद्यापीठ, कुरूक्षेत्र). ९७ किलो: साहील (गुरु काशी विद्यापीठ, भटिंडा), अभिषेक खोखर (छ. चरणसिंग विद्यापीठ, मेरठ), आकाश (चित्करा विद्यापीठ, रायपुर, पंजाब), दिपक कुमार (कलिंगा विद्यापीठ, छत्तीसगढ). १२५ किलो : अनिरूद्ध कुमार (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), आकाश अंतिल (गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा), अमन (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर), अक्षय एस. मंगावडे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना रोहतकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाचा संघ.** (छाया : पप्पू अत्तार)

## शिवाजी विद्यापीठाला कांस्य

स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे १० कुस्तीपटू सहभागी झाले होते. त्यांनी उत्तम कामगिरीचे प्रदर्शन केले. अक्षय मंगावडे याने १२५ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक पटकावून विद्यापीठास कांस्य पदक मिळवून दिले. तो कोतोली- माळवाडी येथील श्रीपतराव चौगुले कला व वाणिज्य महाविद्यालयाचा खेळाडू आहे.

## खेळाडूंना डोपिंगच्या दुष्परिणामांची जाणीव करून द्या

डोपिंगसदृश प्रकार झाल्यास संघ व्यवस्थापकांनी तातडीने ते निदर्शनास आणावेत. अशा कोणत्याही गैरप्रकारांबाबत एआययू अत्यंत गंभीर आहे. डोपिंगमुळे खेळाडूंच्या भवितव्यावर गंभीर दुष्परिणाम होतात. कारकीर्द धोक्यात येऊ शकते, याची जाणीव त्यांना करून द्यावी. खेळाडूंना योग्य मार्गाने यश मिळविण्यास उद्युक्त करा, असे आवाहन भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक यांनी केले.

25 JAN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## आंतरविद्यापीठ कुस्ती; ‘भटिंडा’ उपविजेता, ‘कुरुक्षेत्र’ तिसऱ्यास्थानी

# रोहतकचे विद्यापीठ ‘फ्रीस्टाईल’मध्ये विजेता



**अक्षय मंगावडे**

कोल्हापूर, ता. २४ : येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत आज रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठाने फ्रीस्टाईलमध्ये सर्वसाधारण विजेतेपदावर नाव कोरले. भटिंडा येथील गुरू काशी विद्यापीठाने दुसरे, तर कुरुक्षेत्र विद्यापीठाने तिसरे स्थान मिळविले. शिवाजी विद्यापीठाच्या अक्षय मंगावडे याने १२५ किलो वजनी गटात ब्रॉंझपदकाची कमाई केली. तो, कोतोली-माळवाडी येथील श्रीपतराव चौगुले कला व वाणिज्य महाविद्यालयाचा खेळाडू आहे.






**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत मंगळवारी फ्रीस्टाईल प्रकारातील लढतींचा समारोप झाला. पहिल्या छायाचित्रात १२५ किलो वजनगटातील उपांत्यफेरीत सुदर्शन खोत विरुद्ध अक्षय मंगावडे यांच्यात लढत झाली. दुसऱ्या छायाचित्रात रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठाला सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक देताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. सुरेश कुमार मलिक, विलास शिंदि, आदी.**

**(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा )**

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेश कुमार मलिक, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते विजेत्यांना गौरविण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह स्पर्धा सुरू आहे. डॉ. मलिक, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, प्रकाश पाटील (कऱ्हाड), स्पर्धा संचालक दिलीप पवार, तांत्रिक संचालक बंकट यादव, आंतरराष्ट्रीय पंच नवनाथ ढमाळ उपस्थित होते. डॉ. विजय रोकडे यांनी स्वागत केले. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी आभार मानले. ग्रीको रोमन प्रकारातील स्पर्धा शुक्रवार (ता. २८) ते रविवार (ता. २९) दरम्यान आहेत.

**विविध वजनी गटातील पदक प्राप्त मल्ल...**

विविध वजनी गटांमध्ये सुवर्ण, रौप्य, कांस्यपदक प्राप्त करणाऱ्या मल्लांमध्ये ५७ किलो वजनगट : सतीश (भिवानी), सुमित (हरियाणा), अमितकुमार (गुरुग्राम), सुनिल (राजस्थान). ६१ किलो: सुधीर जाट (मणीपूर), आशिष ( हरियाणा), लोकपाल गोहर (इंदूर), उदित (रोहतक). ६५ किलो: जसकरण सिंग (पटियाला), रोहित (मणीपूर), आयुष कुमार (मेरठ), सचिन दहीया (चंदिगड). ७० किलो: परवेंदर ( फगवाडा), विजय मलिक (मोहाली), राकेश कुमार ( राजस्थान), सौरभ सेहावत (भटिंडा). ७४ किलो: रविराज चव्हाण (सोलापूर), मोहीत (पंजाब), दीपक (हरियाणा), दिपक (कुरुक्षेत्र). ७९ किलो: सागर जगलान (कुरुक्षेत्र), अनिकेत (रोहतक), अनुज कुमार (मेरठ), मुकुल मिश्रा (बल्लिया). ८६ किलो: संदिप (पंजाब), एम.एम. सरनोबत (नांदेड), प्रतीक जगताप (पुणे), संजीव (भटिंडा). ९२ किलो: अजय (रोहतक), अंकित (हरियाणा), पवन (अमृतसर), आशिष (कुरुक्षेत्र). ९७ किलो: साहिल (भटिंडा), अभिषेक खोखर (मेरठ), आकाश (पंजाब), दिपक कुमार (छत्तीसगढ).

### डोपिंगसदृश प्रकार त्वरित निदर्शनास आणा

■ डोपिंगसदृश प्रकार झाल्यास संघ व्यवस्थापकांनी तातडीने ते निदर्शनास आणावेत. अशा कोणत्याही गैरप्रकारांबाबत एआययू अत्यंत गंभीर आहे. डोपिंगमुळे खेळाडूंच्या भवितव्यावर गंभीर दुष्परिणाम होतात. कारकीर्द धोक्यात येऊ शकते, याची जाणीव त्यांना करून द्यावी, असे आवाहन डॉ. मलिक यांनी केले.

24 JAN 2023 पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोहतकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाला सर्वसाधारण विजेते

## भटिंडा विद्यापीठ उपविजेते; 'कुरुक्षेत्र' तिसऱ्या स्थानी, आंतरविद्यापीठ फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धा समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात गेले तीन दिवस सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत मंगळवारी रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. शिवाजी विद्यापीठाच्या अक्षय मंगावडे याने १२५ किलो वजनी गटात कास्यपदक प्राप्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात पुरस्कार प्रदान समारंभ पार पडला. मंगळवारी फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेचा समारोप झाला.

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत भटिंडा येथील गुरू काशी विद्यापीठाने द्वितीय स्थान, तर कुरुक्षेत्र येथील कुरुक्षेत्र विद्यापीठाने तृतीय स्थान प्राप्त केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विजेतेपदाच्या ट्रॉफींचे वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. मलिक म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये सुरू असलेल्या या कुस्ती स्पर्धा अत्यंत निकोप व पारदर्शक पद्धतीने पार पडल्या असून, ग्रीको-रोमन स्पर्धांमध्येही हीच पारदर्शकता जोपासली जाईल, अशी ग्वाही भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. मलिक यांनी फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेच्या समारोप समारंभात बोलताना दिली.



अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करताना मान्यवर.

### 'खेळाडूंना डोपिंगच्या दुष्परिणामांची जाणीव द्या'

डोपिंगसदृश प्रकार झाल्यास संघ व्यवस्थापकांनी तातडीने ते निदर्शनास आणावेत. अशा कोणत्याही गैरप्रकारांबाबत एआययू अत्यंत गंभीर आहे. डोपिंगमुळे खेळाडूंच्या भवितव्यावर गंभीर दुष्परिणाम होतात. कारकीर्द धोक्यात येऊ शकते, याची जाणीव त्यांना करून द्यावी. खेळाडूंना योग्य मार्गाने यश मिळविण्यास उद्युक्त करा, असे आवाहनही डॉ. मलिक यांनी याप्रसंगी केले.

यावेळी विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, कराड येथील प्रकाशबापू पाटील यांच्यासह स्पर्धा संचालक दिलीप पवार, तांत्रिक संचालक बंकट यादव, आंतरराष्ट्रीय रेफ्री नवनाथ ढमाळ आदी उपस्थित होते. डॉ. विजय रोकडे यांनी कार्यक्रमाचे स्वागत केले, तर क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी आभार मानले.

स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या अक्षय मंगावडे याने १२५ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक पटकावून विद्यापीठास कास्यपदक मिळवून दिले. तो कोतोली-माळवाडी येथील श्रीपतराव चौगुले कला व वाणिज्य महाविद्यालयाचा खेळाडू आहे.

स्पर्धेत विविध वजनी गटांमध्ये सुवर्ण, रौप्य व कास्यपदक प्राप्त करणाऱ्या कुस्तीपटूंची नावे अशी : ५७ किलो : सतीश (भिवानी), सुमित (मिरपूर, हरियाणा), अमितकुमार (गुरुग्राम), सुनील (चिरू, राजस्थान). ६१ किलो : सुधीर जाट (मणिपूर), आशीष (हरियाणा), लोकपाल गोहर (इंदूर), उदित (रोहतक). ६५ किलो : जसकरण सिंग (पटियाला), रोहित (मणिपूर), आयुष कुमार (मेरठ), सचिन दहिया (चंदीगड). ७० किलो : परवेंदर (फगवाडा), विजय मलिक (मोहाली), राकेश कुमार (राजस्थान), सौरभ सेहावत (भटिंडा).

७४ किलो : रविराज चव्हाण (सोलापूर), मोहित (पंजाब), दीपक (हरियाणा), दीपक (कुरुक्षेत्र). ७९ किलो : सागर जगलान (कुरुक्षेत्र), अनिकेत (रोहतक), अनुज कुमार (मेरठ), मुकुल मिश्रा (बल्लिया). ८६ किलो : संदीप (राजपुरा पंजाब), एम. एम. सरनोबत (नांदेड), प्रतीक जगताप (पुणे), संजीव (भटिंडा). ९२ किलो : अजय (रोहतक), अंकित (हरियाणा), पवन (अमृतसर), आशीष (कुरुक्षेत्र). ९७ किलो : साहील (भटिंडा), अभिषेक खोखर (मेरठ), आकाश (पंजाब), दीपक कुमार (छत्तीसगड). १२५ किलो : अनिरुद्ध कुमार (रोहतक), आकाश अंतिल (भटिंडा), अमन (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर), अक्षय एस. मंगावडे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 JAN 2023

तरूण भारत


# रोहतकच्या दयानंद विद्यापीठाने पटकावले सर्वसाधारण विजेतेपद

## अ. भा. आंतरविद्यापीठ फिस्टाईल कुस्ती स्पर्धा : भटिंडा येथील गुरु काशी विद्यापीठाला उपविजेतेपद : कुरुक्षेत्र विद्यापीठाला मिळाले तिसरे स्थान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेली अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेत गाजवत रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. भटिंडा येथील गुरू काशी विद्यापीठाने उत्तम कामगिरीच्या जोरावर उपविजेतेपद व कुरुक्षेत्र येथील कुरूक्षेत्र विद्यापीठाने तिसरे स्थान मिळवले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेश कुमार मलिक, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठांच्या यशस्वी संघांना चषक देऊन गौरवले. यावेळी विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, कराड येथील प्रकाशबापू पाटील, स्पर्धा संचालक दिलीप पवार, तांत्रिक संचालक बंकट यादव, आंतरराष्ट्रीय पंच नवनाथ ढमाल व क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.





**कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावलेल्या महर्षी दयानंद विद्यापीठाला (रोहतक) चषक देऊन गौरवताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. सुरेशकुमार मलिक, डॉ. विलास शिंदे, डॉ. शरद बनसोडे व डॉ. प्रकाश गायकवाड आदी. दुसऱ्या छायाचित्रात अलवार येथील राजर्षी भर्तृहरी विद्यापीठाच्या गौरववर शिवाजी विद्यापीठाच्या अक्षय मंगावडेने विजय मिळवल्याचे सुचित करताना पंच.**

शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात ही स्पर्धा सुरु आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संघातून स्पर्धेत उतरलेल्या अक्षय मंगावडे याने १२५ किलो वजनी गटात कांस्य पदक पटकावले. अक्षयने अलवार येथील राजर्षी भर्तृहरी विद्यापीठाच्या गौरववर विजय मिळवला. अक्षय हा कोतोली–माळवाडी (ता. पन्हाळा) येथील श्रीपतराव चौगुले कला व वाणिज्य महाविद्यालयाचा मल्ल आहे.

स्पर्धेअंतर्गत पदक प्राप्त करणाऱ्या मल्लांची नावे अनुक्रमे वजन व गटानुसार अशी : ७४ किलो : रविराज चव्हाण (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर), ८६ किलो : संदिप (चित्करा विद्यापीठ, राजपुरा पंजाब), एम. एम. सरनोबत (स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), प्रतीक जगताप (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे), संजीव (गुरु काशी विद्यापीठ, भटिंडा). रायपुर, पंजाब), दीपक कुमार (कलिंगा विद्यापीठ, छत्तीसगढ) १२५ किलो : अनिरूद्ध कुमार (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), आकाश अंतिल (गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा), अमन (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर), अक्षय एस. मंगावडे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर).

### 'मल्लांना उत्तेजक पदार्थांच्या दुष्परिणामांची जाणीव करून द्या'

बक्षीस वितरण समारंभादरम्यान बोलताना डॉ. सुरेशकुमार मलिक म्हणाले, गेल्या तीन दिवसांपासून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा शिस्तबद्ध व पारदर्शकपणे सुरु आहे. तेव्हा मल्लांनी स्वयंशिस्त पाळतानाच स्पर्धेत उत्तेजक पदार्थांचे सेवन करुन स्पर्धेला कलंकीत करु नये. जे मल्ल उत्तेजक पदार्थांचे सेवन करुन कुस्तीसाठी मॅटवर आल्याचे आढळतील, त्यांची एआययूकडून गंभीर दखल घेतली जाईल. त्याचा वाईट परिणाम मल्लांना भोगावा तर लागेलच, शिवाय त्याचे भवितव्यही धोक्यात येईल. तेव्हा प्रशिक्षकांनी आपल्या मल्लांना उत्तेजक पदार्थ व त्याच्या दुष्परिणांची माहिती मल्लांना द्यावी, असे आवाहन डॉ. सुरेशकुमार मलिक यांनी केले.

25 JAN 2023 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदे यांचे काम राजहंसाप्रमाणे देखणे

## किशोर बेडकीहाळ : कार्याची दखल घेतली नाही, विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्राला सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे काम राजहंसाप्रमाणे देखणे होते, पण त्यांच्या कार्याची दखल फारशी घेतली नाही. म्हणून दीर्घकाळ महाराष्ट्रात ते उपेक्षित राहिले, असे मत ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी मंगळवारी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्रातर्फे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त आयोजित दोन दिवसांच्या चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. भाषा भवनमध्ये हे चर्चासत्र होत आहे. कुलगुरू डॉ. प्रा.डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय चर्चासत्राचे उदघाटन मंगळवारी किशोर बेडकीहाळ यांच्या हस्ते रोपास पाणी घालून करण्यात आले. यावेळी डॉ.डी.टी. शिर्के, प्रा.जयसिंगराव पवार, डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा.नंदकुमार मोरे उपस्थित होते.

बेडकीहाळ म्हणाले, महात्मा गांधी आणि महर्षी शिंदे यांचे समाज सुधारणासंबंधीचे काम मोठे आहे. यातील गांधी यांच्या वाट्याला विकृतीकरण आले, तर शिंदे बेदखल राहिले. शिंदे महाराष्ट्राचे असूनही राजकीय आणि सामाजिक पटलावर दुर्लक्षित राहिल्याची खंत वाटते.

कुलगुरू डॉ.शिर्के म्हणाले, महर्षी शिंदे यांचे काम स्वातंत्र्यापूर्वीचे आहे, पण त्या काळी त्यांनी शेती, समाज सुधारणासंबंधी उपस्थित केलेले प्रश्न आजही कायम आहेत. त्यांच्या काम नेहमीच प्रेरणा देणारे असेल.

प्र.कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.नंदकुमार मोरे यांनी पाहुण्याची ओळख करून दिली. यावेळी डॉ.राजन गवस, प्रा.सुनीलकुमार लवटे, प्रा.मेघा पानसरे उपस्थित होत्या. राजेश पाटील यांनी आभार मानले.

24 JAN 2023

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ स्तरावरील स्पर्धांत मॅटवरील कुस्तीच्या बरोबरीने मातीतील कुस्तीचाही समावेश करावा

**श्रीमंत शाहू छत्रपती महाराज**

**कोल्हापूर, ता.२३ (प्रतिनिधी)**

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरावरील स्पर्धांमध्ये मॅटवरील कुस्तीच्या बरोबरीने पारंपरिक मातीतील कुस्तीचाही समावेश करावा, अशी सूचना श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी आज येथे केली.

शिवाजी विद्यापीठात आज अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल व ग्रीको-रोमन कुस्ती (पुरूष) स्पर्धांचा उद्घाटन समारंभ आज श्रीमंत शाहू छत्रपती महाराज आणि हिंदकेसरी दीनानाथ सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.



यावेळी हिंदकेसरी दीनानाथ सिंह, डॉ. सुरेशकुमार मलिक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी श्रीमंत शाहू महाराज यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद दाखल भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक यांना पारंपरिक कुस्तीचा एआययूच्या क्रीडा स्पर्धांत समावेश करण्याबाबत विचार करण्याची विनंती केली.

यावेळी विष्णू जोशीलकर, उत्तमराव पाटील, विनोद चौगुले, बाबासाहेब शिरगावकर, रंगराव हर्णे, नामदेव मोळे, चंद्रकांत चव्हाण, अशोक माने, संभाजी वरूटे, राम सारंग, अक्षय डेळेकर, बंकट यादव, नवनाथ ढमाल, रोहिदास कांबळे, संभाजी पाटील आणि दिलीप पवार यांचा श्रीमंत शाहू महाराजांच्या हस्ते शाल व स्मृतिचिन्ह प्रदान करून सत्कार करण्यात आला. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश कांबळे आणि डॉ. अभिजीत वणिरे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
25 JAN 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीधर, शिक्षक गटातून मोर्चेबांधणी

## विद्यापीठ व्यवस्थापन परिषद निवडणूक : ८ फेब्रुवारीस मतदान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीनंतर आता व्यवस्थापन परिषदेच्या आठ सदस्यपदासाठी निवडणूक दि. ८ फेब्रुवारीला होणार आहे. त्यासाठीची सूचना दि. १८ जानेवारीस प्रसिद्ध झाली आहे. शिक्षक व पदवीधर गटातील निवडणूक बिनविरोध होईल का, याबाबत अनिश्चितता आहे. त्यासाठीच जोरदार मोर्चेबांधणी सुरू झाली आहे.

एकूण आठ सदस्य निवडले जाणार आहेत. या सर्वांचाच कालावधी पाच वर्षांचा असतो. कोणत्याही कारणाने हे सदस्यपद रिक्त झाल्यास ते नव्याने भरता येत नाही. त्यापैकी चार सदस्य राखीव प्रवर्गातून रोटेशन पद्धतीने निवडले जातात. उर्वरित चारची निवडणूक होते; परंतु, त्यातही संस्थागट व प्राचार्य गटातून ती बिनविरोध होईल, अशी चिन्हे आहेत.

पदवीधर गटात एका जागेसाठी चुरस पाहायला मिळत असून, इच्छुकांची संख्या अधिक आहे. व्यवस्थापन परिषदेसारख्या महत्त्वाच्या अधिकार मंडळावर शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणारे, कामाची तळमळ असणारे उमेदवार मिळावेत जेणेकरून विद्यापीठाच्या विकासास हातभार लावला जाईल, अशी अपेक्षा शैक्षणिक वर्तुळाकडून केली जात आहे. शिक्षक गटातील एका जागेसाठी सुटा आणि आघाडी यांच्यामध्ये चुरस आहे.

व्यवस्थापन परिषदेसाठी संस्था गट, शिक्षक गट, प्राचार्य गट, पदवीधर गट या चार अधिसभा सदस्य गटांमधून प्रत्येकी दोन उमेदवार निवडले जाणार आहेत. या गटातून अधिसभेवर निवडून आलेले आणि कुलपती व कुलगुरू निर्देशित सदस्य हे मतदार असतात. प्रत्येक गटातून रोटेशन पद्धतीने त्या त्या आरक्षित प्रवर्गातील उमेदवार प्रत्यक्ष मतदानाशिवाय निवडून जातील. प्रत्येक गटातून खुल्या प्रवर्गातून एक उमेदवार निवडला जाणार आहे. यासाठी उमेदवार म्हणून त्या- त्या गटातील सर्व सदस्य पात्र असतील.

### निवडणूक कार्यक्रम असा

१. व्यवस्थापन परिषद निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत : २८ जानेवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत.

२. अर्ज छाननी : ३० जानेवारी

३. अर्ज माघार : १ फेब्रुवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत

४. अर्ज वैधतेविषयी अपिल : २ फेब्रुवारी

५. अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध : ३ फेब्रुवारी

६. मतदान व मतमोजणी : ८ फेब्रुवारी



### बलाबल असे..

सध्या अधिसभेवर सुटाचे आठ सदस्य, विद्यापीठ विकास मंचचे चार सदस्य, शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे २० सदस्य, शिवशाहू आघाडीचा एक सदस्य, सुट्टाचे तीन सदस्य असे बलाबल आहे. कुलपती निर्देशित ९, कुलगुरु निर्देशित १ सदस्य अधिसभेवर आले आहेत. अधिसभेमध्ये विकास आघाडीचे सर्वाधिक सदस्य आहेत.

पुढारी

संक्षिप्त

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू झाल्या आहेत. मंगळवारी बॅचलर ऑफ कॉमर्स, बॅचलर ऑफ सायन्स, सोशल वर्क, बॅचलर ऑफ लॉ, बॅचलर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ आर्टर्स, बॅचलर ऑफ व्होकेशन, बॅचलर ऑफ कॉमर्स बँक मॅनेजमेंट ३८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व संलग्नित महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. पथकाकडून परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष नोंद करून परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

पुण्यनगरी

# निसर्गोपचाराचा प्रचार, प्रसार करणे काळाची गरज

## डॉ. के. सत्यलक्ष्मी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

निसर्गोपचार एकाच वेळी शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक अशा सर्व गोष्टींचा उपचार करतो, असे मत राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा संस्था, आयुष मंत्रालय, पुणे यांच्या संचालिका डॉ. के. सत्यलक्ष्मी यांनी राज्यस्तरीय योग व निसर्गोपचार परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागातर्फे एकदिवसीय राज्यस्तरीय योग व निसर्गोपचार परिषद आयोजित करण्यात आली. परिषदेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

डॉ. के. सत्यलक्ष्मी म्हणाल्या, निसर्गोपचारामध्ये गंभीर आजारांवर उपचार त्वरित केला जातो. या उपचारामध्ये दडलेले रोग बाहेर काढून त्यावर उपचार करून कायमचे बरे केले जातात. दिवसभर पाच सत्रात झालेल्या या परिषदेत योग, निसर्गोपचार, ॲक्युप्रेशर, आहारशास्त्र या विषयावर व्याख्याने झाली. यावेळी अधिविभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सुमन बुवा, यशोधन बोकील, आर. एम. जाधव यांच्यासह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

24 JAN 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक ज्ञान आवश्यक

डॉ. संजयकुमार भोसले

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्वसमावेशक ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुणे विभागीय सहनिबंधक डॉ. संजयकुमार भोसले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित 'स्पर्धेचे युग आणि सर्वसमावेशक भारतीय युवा पिढीसमोरील आव्हाने' या विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे होते.

डॉ. भोसले म्हणाले, विद्यार्थ्यांनी माहितीच्या जगात कोणतेही ज्ञान घेताना ते आपल्या करिअरशी सुसंगत असल्याचा विचार व अभ्यास करून घ्यावे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना विधी व ज्ञान यांची माहिती असणे आवश्यक आहे.

राज्य संस्था, राजकीय प्रक्रिया आणि प्रशासन माहीत असलेल्या विद्यार्थ्यांनी राजकारणात उतरले पाहिजे. राजकारणासाठी पैसा आणि वारसा महत्त्वाचा असला तरी आजच्या काळात समाज बदलतो आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. करिअर करण्यासाठी राज्यसेवा व लोकसेवा याअंतर्गत होणाऱ्या परीक्षा, कायद्याचे शिक्षण तसेच संहिता लेखन हा मार्ग स्वीकारला पाहिजे. अथक परिश्रम, ज्ञानाची योग्य दिशा व आत्मविश्वास अवगत केल्यास यशस्वी होता येईल. कोणत्याही यशाचा मार्ग राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासांती मिळवता येतो. यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

स्वागत व प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. के. बी. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन भोसले यांनी केले, तर आभार वैभव पाटील यांनी मानले. यावेळी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, समन्वयक, सहा. प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ



**सांगवडे :** येथे श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव विलास सोयम. शेजारी अन्य.

# युवकांनी मन, बुद्धीच्या विकासाचा ध्यास धरावा : विलास सोयम

सांगवडेवाडी, ता. २४ : घरचा, समाजाचा, गावचा, राज्याचा पर्यायाने राष्ट्राच्या विकासासाठी युवकांनी मन आणि बुद्धीच्या विकासाचा ध्यास धरावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव विलास सोयम यांनी केले. सांगवडे (ता. करवीर) येथे महावीर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होतो.

अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य श्रीधर हेरवाडे म्हणाले, "ग्रामीण युवकांची अस्मिता, ऊर्जा जागवण्यासाठी अशा संस्कार शिबिरांची गरज असते."

प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे म्हणाले, "युवकांनी अभ्यासासह व्यक्तिमत्त्व विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.' सरपंच रूपाली कुंभार, उपसरपंच सचिन माने, ग्रामविकास अधिकारी सारिका बंडगर, सदस्या सायली पाटील, संपदा सोनवणे, माजी सरपंच दादासो घाटगे, गौतम पोवार, सुकुमार जगनाडे, सुदर्शन सोनवणे, नानासो पाटील, भरत चौगुले उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक प्रा. रविदास पाडवी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. अंकुश बनसोडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन श्रावणी शंकरदास यांनी केले. आभार प्रा. सुनील चौगुले यांनी मानले.

25 JAN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी सर्वसमावेशक ज्ञान प्राप्त करावे : डॉ. भोसले

कोल्हापूर, ता. २३ : विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या माध्यमातून करियर घडविता येते. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्वसमावेशक ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुणे विभागीय सहनिबंधक डॉ. संजयकुमार भोसले यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे राज्यशास्त्र विषयातील राजमार्ग : विविध क्षेत्रातील यशस्वीतांची यशोगाथा, राज्यशास्त्र विषय अंतर्गत माहे व्याख्यान उपक्रम आयोजित स्पर्धेचे युग आणि सर्वसमावेशक भारतीय युवा पिढी समोरील आव्हाने या विशेष ऑनलाईन व्याखानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे होते. यावेळी संचालक प्रा.डॉ. डी. के.मोरे, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे उपस्थित होते.

डॉ.भोसले म्हणाले, ''स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना विधी व ज्ञान यांची माहिती असणे आवश्यक आहे. राज्यसंस्था,राजकीय प्रक्रिया आणि प्रशासन माहित असलेल्या विद्यार्थ्यांनी राजकारणात उतरले पाहिजे. कोणत्याही यशाचा मार्ग राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासांती मिळविता येतो. यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.''

स्वागत व प्रास्ताविक समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. परिचय डॉ. सुर्यकांत गायकवाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. सचिन भोसले यांनी केले. आभार वैभव पाटील यांनी मानले.

25 JAN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रामाचं कंदमुळं! छे, हे तर घायपात...

रिपोर्ताज
अमोल सावंत

**यात्रा-जत्रात रामाच्या कंदमुळाची विक्री काही विशिष्ट लोक करतात. आजही श्री जोतिबा डोंगरावरील यमाई देवीच्या मंदिरालगत, बिंदू चौक ते भवानी मंडप रस्त्याकडेला अशा रामकंदाची विक्री सुरू आहे. रामकंदाचे मूळ इतके मोठे कसे? हा खराच कंद आहे का, असा प्रश्न शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. विनोद शिंपले, डॉ. मानसिंगराज निंबाळकर, डॉ. नीलेश पवार, डॉ. घनश्याम दीक्षित या संशोधकांना पडला. या रामकंदाचा शोध शास्त्रीय दृष्टिकोनातून घेतला. तेव्हा रानमाळावर उगविणारी घायपात/केकताडाचे ते झुडूप आहे, हे सिद्ध झाले. अखेर कितीतरी वर्षे देशातील वनस्पतीशास्त्रज्ञांना पडलेल्या या प्रश्नाचे उत्तर मिळाले. अशा या घायपाताबद्दलची माहिती घेऊ या...**

## धक्कादायक... पण सत्य !

■ डॉ. शिंपले, डॉ. पवार, डॉ. निंबाळकर, डॉ. दीक्षित यांनी जोतिबा डोंगरावर कंदाची विक्री करणाऱ्या व्यक्तींकडे चौकशी केली. त्याने हा कंद मूळ आफ्रिकेतून आयात केल्याचे सांगितले. तेव्हा खरेच कंद मुळं आहे का, याचा शोध घेण्यासाठी संशोधकांनी कंदाचे काही काप खरेदी केले. वनस्पतीत एकदलीय, द्विदलीय अशी रचना असते. तेव्हा या कंदाची व्हॅस्क्युलर बंडल रचना तपासली. तेव्हा या कंदाची मोनोकॉट (एकदलीय) रचना आहे, ते समजले. मोनोकॉटला आगंतुक मूळ असते. ते जमिनीवर असते. डॉ. निंबाळकर यांनी या वनस्पतीच्या शास्त्रीय ओळखीकरिता डीएनए बारकोडिंगची पद्धत वापरली. कंदाच्या कापाची जनुकिय चाचणी घेतली. तेव्हा ते अगेव्ह सिसलाना (घायपात/केकताड) असल्याचे शिक्कामोर्तब झाले. ही वनस्पती आफ्रिकातून नव्हे तर आपल्या माळरानावरील घायपातच असल्याचे आढळले.



### घायपाताचे महत्त्व

- वाख, काथ्यापासून अनेक पदार्थांची निर्मिती
- साखर भरण्यासाठी पोत्यांची निर्मिती
- औद्योगिक, रसायन, फार्मास्युटिकल उद्योगात महत्त्व

## सांडपाण्यात घायपातचा बुंदा टाकून होतो कंद तयार

■ जेव्हा घायपाताला फुलोरा येतो, तेव्हा पाने काढून बुंदा रंधाने गुळगुळीत करतात. गुळगुळीत रंधाला मुलतानी मातीचा थर देतात, तेव्हा ते प्रत्यक्ष कंदमुळं असल्याचे दिसते; मात्र घायपातच्यावरील खोडाचा तो भाग आहे, हे लक्षात घ्यावे. डॉ. शिंपले म्हणाले, "श्री यल्लम्मा मंदिराच्या बाजूला ओढा आहे. त्या ओढ्यातील पाण्यात हा गुळगुळीत केलेला बुंदा टाकला जातो. दर रविवारी हा बुंदा सांडपाण्यातून काढला जातो. बुंद्यावर सॅक्रीन टाकून तो गोड केला जाते. मग चकत्याच्या स्वरुपात विक्री केली जाते."

## रस्त्याकडेला कुंपण घायपात वनस्पतीचे

■ घायपात ही मूळची मेक्सिकोमधील. पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी ती ५०० वर्षांपूर्वी भारतात आणली. घायपाताचे प्रकार जगभरात दिसतात. कोल्हापूर परिसरात/जिल्ह्यात 'अगेव्ह सिसलाना' हा घायपाताचा प्रकार आढळतो. शहरातील शेंडा पार्क येथील कृषी संशोधन केंद्राजवळील रस्त्याकडेला कुंपण म्हणून घायपात लावलेला दिसतो. जिथे पाऊस कमी पडतो, अशा शुष्क प्रदेशात घायपात दिसतो.

## प्रवृत्ती धोकादायक

■ घायपाताचा बुंदा रामकंद म्हणून वापरणे धोकादायक आहे. या रामकंदाची ओळख का दडवली, हा एक प्रश्नच आहे. हा रामकंद तुम्ही घेताना चकतीच्या स्वरुपात दिला जातो. जास्त प्रमाणात तो दिला जात नाही. जास्त प्रमाणात दिला तर शरीराला अपायकारक होऊ शकतो, हे विक्री करणाऱ्यालाही माहिती असते. तरीही ते आजसुद्धा विक्री का करत आहेत, असा प्रश्न आहे.

> हा रामकंद नाही, असे माहिती असूनही काही विशिष्ट लोक हा रामकंदच आहे, असे म्हणून विक्री करतात. संबंधितांनी अशा पद्धतीने विक्री करू नये. कुणीही रामकंदाच्या नावाखाली अशा कंदाचा काप घेऊन खाऊ नये.
>
> **- डॉ. विनोद शिंपले**

> कित्येक वर्षे महाराष्ट्रातच नव्हे, तर देशातील अनेक भागात रामकंद म्हणून या कंदाची विक्री सुरू आहे. हा रामकंद नेमका काय आहे, याचा उलगडा देशातील नामवंत वनस्पतीशास्त्रज्ञांना झाला नव्हता. शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातील आम्ही संशोधकांनी रामकंदाचे गूढ उलगडण्यात यश मिळविले.
>
> **-डॉ. मानसिंगराज निंबाळकर**



कोल्हापूर : करवीर नगर वाचन मंदिराच्या समोरील रस्त्याशेजारी रामाच्या नावाने कंदांची विक्री सुरू असते.